महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

जि. सोलापूर (महाराष्ट्र) – ४१३३०४



—: विषय :—

## Queue Management System(Time Slot) for Free/Paid Darshan & Integrated Services.

दर्शन क्यू मॅनेजमेंट'' सिस्टीमसाठी सल्लागार नियुक्ती बाबत

नामांकित नोंदणीकृत कंपन्यांकडून स्वारस्य अभिव्यक्ती

**(EXPRESSION OF INTEREST)** मागविणेबाबत

# सन २०१८ – १९

## अनुक्रमणिका



| अ. क्र. | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | |
| २ | माहिती, अटी व शर्ती. | |
| ३ | जाहिरात तपशिल. | |
| ४ | परिशिष्ट क्र. १ | |
| ५ | परिशिष्ट क्र. २ | |
| ६ | परिशिष्ट क्र. ३ | |
| ७ | परिशिष्ट क्र. ४ | |
| ८ | Procedure, Samples, Diagrams & Architecture. | |

# प्रस्तावना

पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ च्या तरतुदीनुसार पंढरपूर येथील श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिराचा कारभार दि.२६/०२/१९८५ पासून श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरकडे शासनामार्फत सोपवण्यात आलेला आहे.

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीकडे श्री. विठ्ठल रूक्मिणीचे पंढरपूरातील मुख्य मंदिर आणि मंदिरातील ३६ परिवार देवता, तसेच पंढरपूर शहर व परिसरातील २८ परिवार देवता यांचे व्यवस्थापन करण्याचे कामकाज आहे. यासर्व देवदेवतांची पुजा–अर्चा इ. दररोजचे नित्योपचार, नैमत्तिक उपचार मंदिरात व मंदिराबाहेरील परिवार देवतांच्या मंदिरात साजरे करण्यात येणारे यात्रा व उत्सव, वर्षातुन चार वेळा येणाऱ्या आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री या चार मोठ्या यात्रा कालावधीत भाविकांची गर्दी मोठया प्रमाणात असते.

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर हे दक्षिण काशी म्हणूनही ओळखले जाते. लाखो वारकऱ्यांच्या श्रध्देचे स्थान व उभ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या या दैवताच्या दर्शनासाठी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू या राज्यातून व देशभरातून वर्षभरात अंदाजे १ कोटीपेक्षा जास्त भाविक भेटी देताता. त्यांना मंदिर समितीकडून पुरेशा प्रमाणात सोयीसुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

श्री. विठ्ठल रूक्मिणीच्या दर्शनाला येणाऱ्या भाविकांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. श्रीच्या पदस्पर्शदर्शनाला येणाऱ्या भाविकांना गर्दीच्या कालावधीत १० ते १५ तास रांगेत उभे रहावे लागते व गर्दीचा कालावधी सोडून इतरवेळी ३ ते ५ तास रांगेत उभे रहावे लागते. त्यामुळे भाविकांचा वेळ कमी व त्रास कमी करण्यासाठी शिर्डी देवस्थान व तिरूपती बालाजी देवस्थान यांच्या धर्तीवर आपल्याकडे ‘‘दर्शन क्यू मॅनेजमेंट’’ सिस्टीम राबविणे आवश्यक आहे. सदर प्रणाली केंद्र शासनाच्या योजनेमधून राबविण्यात येणार असल्याने, त्यासाठी मंदिर समितीवर कोणताही आर्थिक भार पडणार नाही. केवळ सदर प्रणाली राबविणाऱ्या एजन्सीला पायाभुत सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

# माहिती, अटी व शर्ती

१. दर्शन क्यू मॅनेजमेंट या क्षेत्रातील मान्यता प्राप्त कंपनी / नोदणीकृत कंपन्या /अनुभवी व्यक्ती/ सल्लागार / तंज्ञ व्यक्ती यांच्याकाडून ''दर्शन क्यू मॅनेजमेंट'' सिस्टीम राबविणेसाठी एजन्सीला पायाभुत सुविधा उपलब्ध करून देणेसाठी प्रस्ताव लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत. नमूना प्रस्तावाचा अर्ज कार्यालयीन वेळेत श्री. संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील.

२. प्रस्ताव स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून दि.०८/१०/२०१८ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर कंपनीचे नाव व पूर्ण पत्ता आणि ''दर्शन क्यू मॅनेजमेंट'' सिस्टीमसाठी सल्लागार नियुक्ती बाबत '', असा सविस्तर तपशिल नमुद करावा. प्रस्ताव समक्ष कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर, जि. सोलापूर यांचे नावे श्री. संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोष्टाने पाठवावे. **उशीरा आलेले अथवा अपूर्ण प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.**

३. प्रस्तावासोबत रक्कम रू. १०,०००/—डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. डी. डी. 'कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर' यांचे नावे काढावा. सदर रक्कम सदरची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधितांना अदा करण्यात येईल. सदरच्या रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

४. देशातील देवस्थाने, शासकीय, निमशासकीय, खाजगी क्षेत्रात या पद्धतीचे काम केल्याचा अनुभव असावा.

५. अर्जदारास संगणक ज्ञान, **MSCIT Computer Hardware & Networking** , इत्यादीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

६. सदर पदावरील पात्र संस्था /व्यक्तीची / कंपनीची निवड तंज्ञ अधिकारी व मंदिर समिती पदाधिकारी यांचेकडून मुलाखतीद्वारे करण्यात येईल.

७. पात्र संस्था /व्यक्तीची / कंपनीची मुलाखतीवेळी आवश्यक ती मुळ कागदपत्रे व त्यांच्या सांक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक राहील.

८. सदरची नियुक्ती ११ महिन्याच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर करण्यात येईल.

९. ११ महिने पुर्ण झालेनंतर कामातील प्रगती आणि कामाची गरज विचारात घेवून, संबंधितांकडून योग्य अटी व शर्तीचे बंधपत्र घेवून, त्यांची नियुक्ती पुढे चालू ठेवणेबाबत विचार करण्यात येईल.

१०. सदर नियुक्तीद्वारे मंदिर समितीकडे कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा कोणताही अधिकार उमेदवारास राहणार नाही.

११. कामाची प्रगती व वर्तन असमाधानकारक असल्यास तात्काळ प्रस्ताव रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांना राहील

१२. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या नमुन्यांतच प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

१३. प्राप्त प्रस्ताव दि. ०९/१०/२०१८ रोजी स. ११.०० वा. समितीच्या कार्यालयात उघडण्यात येतील.

१४. सदरबाबत दि. ०३/१०/२०१८ रोजी स.११.०० वा. समितीच्या कार्यालयात प्रीबीड बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरी काही सुचना अथवा हरकती असल्यास आपणास उपस्थित राहून, त्यादिवशी मांडता येतील.

१५. कोणताही प्रस्ताव / सर्व प्रस्ताव कोणतेही कारण न दर्शविता नाकारणे किंवा स्विकारणे अथवा स्थगित ठेवणे याबाबतचे संपूर्ण अधिकार कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

१६. कंपन्यांच्या कोणत्याही अटी व शर्ती समितीवर बंधनकारक असणार नाहीत. तसेच सदर जाहिरातीमुळे भाविकांच्या श्रध्देस अथवा मंदिर समितीच्या प्रतिमेस तडा गेल्यास, आपला प्रस्ताव व कोणतेही कारण न देता एकतर्फी रद्द करण्यात येईल.

१७. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल त्या कंपन्यांवर बंधनकारक राहतील.

१८. प्रस्ताव ज्यांचे नांवे मंजूर होईल, त्यांनी रक्कम रू.५००/— चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (Affidavit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

१९. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर, जि. सोलापूर हे राहील.

२०. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस संबंधितास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर प्रस्ताव कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

२१. प्रशासकीय व अन्य कारणास्तव सदरची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

२२. सदरबाबत महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

## कामकाजाचे स्वरूप :–

१. **''दर्शन क्यू मॅनेजमेंट''** प्रणाली राबविण्यासाठी पंढरपूर शहर व परिसराच सर्वेक्षण करणे.

२. आषाढी, चौत्री, कार्तिकी माघी वारी व एकादशी तसेच अधिकमास इतर काळात होणारी गर्दी लक्षात घेता टोकन वितरण केंद्राची जागा निश्चित करणे. व सदर टोकन वितरण केंद्रे उभारणे.

३. मंदिरातील मुख्य नियंत्रण कक्ष व सर्व टोकन वितरण केंद्रे परस्परांना जोडण्यासाठी प्रभावी संपर्क यंत्रणा तयार करणे.

४. दर्शन व्यवस्थापनासाठी अद्यावत नकाशा तयार करणे. मंदिराचे आतील व बाहेरील Distribution & Verification Counters संगणकीय चित्रण (लेआऊट) तयार करणे.

५. दर्शन रांगेच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक असे टोकन कार्ड तपासणी केंद्र स्थापन करणे.

६. दर्शन रंग व्यवस्थापनासाठी सिव्हील, ईलेक्ट्रीकॅल कामाचे नकाशे तयार करणे.

७. Distribution & Verification Counters, Server Room Networking व ईलेक्ट्रिक कामाचा आराखडा तयार करणे.

८. दर्शन रांगेतील वारकर्यांना दर्शनाचे टाईम स्लॉट ठरवणे व सदर टाईम स्लॉट मधील वारकर्यांना प्रतीक्षाधीन कालावधीसाठी सर्व सुविधायुक्त हॉलची व्यवस्था करणे.

९. मंदिर समितीमार्फत वेळोवेळी सोपविण्यात येणारी सदर कामाविषयक जबाबदारी पार पाडणे.

१०. टोकन दर्शन व्यवस्था राबवणाऱ्या " **Trilok Security Systems India Ptv. Ltd, Tirupati Company** " शी चर्चा करून, सदर यंत्रणा प्रभावी ठरण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणे

# अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र.

(रू.१००/— चे स्टॅम्पपेपरवर नोटरी करून देणे)

मी / आम्ही खाली सही करणार श्री./श्रीमती ——————————————————— श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे नामांकित कंपन्यांकडून अभिव्यक्त स्वारस्य (EXPRESSION OF INTEREST) मागविणेबाबत श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीच्या होणाऱ्या मंजुरी आदेशान्वये अंतिम करण्यात येणारे काम करण्याची व रक्कम अदा करण्याची आमची / माझी तयारी आहे. सदर स्विकृतीबाबत स्वाक्षरीत प्रस्ताव सादर करत आहे / आहोत. तसेच या संमतीपत्राद्वारे मी / आम्ही घोषित करत आहे / आहोत की, सोबतच्या सर्व अटी व शर्ती मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या आहेत. सदरच्या सर्व अटी आम्हांस मान्य असून त्या आमच्यावर बंधनकारक राहतील. अर्जामध्ये देण्यात आलेली माहिती सत्य असून बरोबर आहे.

१) कंपनीधारकाचे नांव :—

२) पत्ता :—

सही व शिक्का

परिशिष्ट ०२

## प्रस्तावधारकाची आवश्यक माहिती

१. पूर्ण नांव :– ----------------------------------------

२. संपूर्ण पत्ता :– ----------------------------------------

----------------------------------------

मोबाईल नं.:– ई–मेल:–

३. कंपनी नोंदणी क्रमांक :----------------------------------------

४. आयकर प्रमाणपत्र :–

(१) पॅन क्रमांक :– ----------------------------------------

५. जीएसटी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र क्रमांक :--------------------------------

६. व्यवसायाच्या संबंधी पूर्व अनुभव :--------------------------------

----------------------------------------

वरील प्रमाणे प्रस्तुत प्रस्तावासोबत माहिती आवश्यक त्या पुराव्याच्या कागदापत्रासह सोबत सादर करत आहे. अर्जात नमुद माहिती व सोबतचे सर्व कागदपत्रे सत्य व बरोबर आहेत.तसेच सोबतच्या सर्व अटी व शर्ती मी / आम्ही वाचल्या असून त्या आमचेवर / माझेवर बंधनकारक राहतील.

स्थळ :–

दिनांक :– नांव व स्वाक्षरी /–

परिशिष्ट ०३

## प्रस्तावासोबत जोडावयाच्या कागदपत्रांचा तपशिल

१. विहित नमुन्यातील अर्ज.

२. पॅन नोंदणी क्रमांक (पॅन कार्ड).

३. कंपनीचे / फर्मचे नोंदणी प्रमाणपत्र.

४. अनुभव प्रमाणपत्रे.

५. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.

६. बयाणा रक्कमेचा डी.डी/ जमा पावतीची झेरॉक्स प्रत.

७. परिशिष्ठ १ ते ४.

**टिप :— वरील सर्व कागदपत्रांवर अर्जदाराने स्वाक्षरी करावी.**

**अर्ज**

दिनांक /०९/२०१७

प्रति,

मा. कार्यकारी अधिकारी सो.

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर, जि. सोलापूर.

**विषय :– ''दर्शन क्यू मॅनेजमेंट'' सिस्टीमसाठी सल्लागार नामांकित नोंदणीकृत कंपन्यांकडून स्वारस्य अभिव्यक्ती मागविणेबाबत नियुक्ती बाबत**

संदर्भ :– दिनांक /०९/२०१८ रोजीचे दै.——————, सोलापूर या वर्तमानपत्रातील प्रसिध्द झालेली जाहिरात.

महोदय,

कारणे विनंती अर्ज करतो/करते कि, संदर्भात नमुद जाहिरातीला अनुसरून मी इलेक्ट्रिक व प्लंबिग कामाच्या सल्लागार पदासाठी अर्ज करीत आहे. मी श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरात काम करण्यास इच्छूक आहे. सदर कामाचा मला पुरेसा अनुभव आहे. तरी माझ्या अर्जाचा सहानूभूतीपूर्वक विचार करून मला सेवा करण्याची संधी द्यावी ही विनंती.

माझी वैयक्तीक माहिती खालील प्रमाणे –

१) पुर्ण नाव ————————————————————————————————————

२) फर्मचे नाव ————————————————————————————————————

३) पूर्ण पत्ता ————————————————————————————————————

————————————————————————————————————

४) संपर्क क्रमांक ————————————————————————————————————

५) जन्मतारीख व वय दि. / /१९ वय : ———— वर्षे.

६) शैक्षणिक पात्रता ——————————————————————————————————————

७) कामाचा अनुभव ——————————————————————————————————————

**८) प्रतिमहा मानधनाची अपेक्षा ————————————————————————————————————**

तरी वरील प्रमाणे माझी सर्व माहिती खरी व बरोबर आहे. सदर नियुक्ती बाबतच्या जाहिरातीतील आणि अर्जासोबतच्या अटी व शर्तीनुसार मी या पदास पात्र आहे. मी सदर अटी व शर्ती वाचलेल्या असून त्या मला मान्य आहेत. तरी माझ्या अर्जाचा सहानभूतीपूर्वक विचार करून काम करण्याची संधी मला द्यावी, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,


(पूर्ण नांव, स्वाक्षरी व फर्मचा शिक्का)

**Note –**


**Procedure, Samples & Diagrams & Architecture.**

1) Pilgrim should come in the Queue to take Access Card
2) Captures photo & finger print (with necessary pilgrim data)
3) 2D (QR) bar-coded system generated label affixed in the access card.
4) Reach the pilgrim to report for Darshan in the specified Time slot.
5) Validate the access card and avail Darshan.
6) (including, Accommodation, Prasadam and etc. if need.

**1) Sample Access Card Format :**





**2) Pilgrim Queue Maintenance by Time Slot :**




## 3) Implementation Model :


### Queue Management System




## 4) Drawing Specification of Double Counters :-



## 5) Drawing Specification of Single Counters :-




## 6) Queue Management system Architecture :

